जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७४५ दिनांक - १४/१०/२०२३**

गुन्हे शाखा युनिट-१,पुणे शहर

## सोन साखळीची जबरी चोरी करणारे दोन कॉलेज तरूण केले जेरबंद

दिनांक ०९/०९/२०२३ रोजी मराठवाडा कॉलेजसमोर बी एम सी रोडवर, डेक्कन पुणे येथून फिर्यादी हे रोडने पायी जात असताना दोन अनोळखी इसमांनी पांढ-या रंगाचे मोपेड वरून येवून त्यांचे गळ्यातील किं रू ८९,०००/- रू किं ची अडीच तोळे वजनाची चैन जबरीने हिसका मारून चोरून नेली होती. सदरबाबत डेक्कन पो स्टे गु र नं. १७५/२०२३ भादवि कलम ३९२,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानुसार गुन्हे शाखा युनिट-१ कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे दिनांक १३/१०/२०२३ रोजी पेट्रोलींग करीत असताना वर नमुद गुन्हा करणारे दोन इसम सिंहगड कॅम्पस परिसरात फिरत असल्याची बातमी पोलीस अंमलदार अजय थोरात, दत्ता सोनवणे व निलेश साबळे यांना मिळाली. वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट-१ कडील अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक १३/१०/२०२३ रोजी सिंहगड कॅम्पस परिसरातुन इसम नामे **१) कार्तिक अनिल देशमुख वय २२ वर्ष रा वडगाव बुदृक, पुणे व क्र.२) अशितोष चंद्रेश पांडे वय २० वर्ष रा वडगाव बुदृक, पुणे** यांना गुन्हा करीत असताना वापरलेली ५०,०००/- रू. कि च्या मोटर सायकलसह ताब्यात घेवून पुढील कार्यवाही करीता डेक्कन पोलीस ठाणेकडील पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री रितेश कुमार,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर, श्री संदिप कर्णिक,मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री अमोल झेंडे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री सुनिल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-१ कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद, सहा पोलीस निरीक्षक आशिष कवठेकर, पोलीस उप निरीक्षक रमेश तापकीर,पोलीस अंमलदार राहुल मखरे अजय थोरात,शंकर कुंभार,शशीकांत नरूटे, शशीकांत दरेकर, दत्ता सोनावणे, निलेश साबळे, आण्णा माने, इम्रान शेख,महेश बामगुडे, शुभम देसाई,विनोद कोंढाळकर, रूक्साना नदाफ यांचे पथकाने केली आहे.


SHABBIR SAYYAD